**हवामानावर आधारीत कृषि सल्ला (पालघर जिल्हा)**

**(ग्रामीण कृषि मौसम सेवा, डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली आणि प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने)**

**(०२३५८) २८२३८७**

**अंक ९२/२०१९** | **दिनांक १५/११/२०१९** | **कालावधी ५ दिवस**


**डॉ. प्रशांत बोडके,**
विभाग प्रमुख,
कृषिविद्या विभाग
९४२०४१३२५५

**डॉ. विजय मोरे,**
नोडल ऑफिसर,
कृषिविद्या विभाग
९४२२३७४००१

**डॉ. शितल यादव,**
तांत्रिक अधिकारी
कृषिविद्या विभाग
८३७९९०११६०


| मागील हवामान आठवडा सारांश (दिनांक ०९/११/२०१९ ते १५/११/२०१९) | | | | | | | हवामानाचे घटक | हवामान पूर्वानुमान (दिनांक १६/११/२०१९ सकाळी ८:३० पासून २०/११/२०१९ सकाळी ८:३० वाजेपर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०९/११ | १०/११ | ११/११ | १२/११ | १३/११ | १४/११ | १५/११ | | १६/११ | १७/११ | १८/११ | १९/११ | २०/११ |
| २३.२ | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | पाऊस (मिमी) | ० | ० | ० | ० | ० |
| ३२.० | २९.० | ३२.० | ३३.५ | ३३.६ | ३३५.० | ३२.४ | कमाल तापमान (अं.से) | ३४ | ३४ | ३४ | ३५ | ३५ |
| २४.० | २३.५ | २१.४ | २१.६ | २.८ | २५.० | २४.० | किमान तापमान (अं.से) | २३ | २३ | २४ | २५ | २५ |
| २ | ० | ० | ० | ० | ० | ० | मेघाच्छादन (ऑक्टा) | ० | १ | ३ | ० | ० |
| ९५ | ८३ | ९१ | ८३ | ९२ | ६१ | ८० | सकाळची सापेक्ष आर्द्रता | ६१ | ६८ | ६९ | ६६ | ५७ |
| ८० | ५९ | ६२ | ५३ | ६८ | ४० | - | दुपारची सापेक्ष आर्द्रता | ४५ | ५१ | ५७ | ५२ | ४६ |
| ३.८ | १.३ | १.९ | १.० | १.० | १.७ | १.६ | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | ९.८ | ९.६ | ९.४ | १०.७ | १०.३ |
| उ. | इ.पु. | शांत | शांत | शांत | नै.प. | प. | वाऱ्याची दिशा | इ.पु. | पु. | पु. | इ.पु. | इ.पु. |
| पाऊस (मिमी) मागील आठवडयातील | | | | | | | पाऊस (मिमी) १/१/२०१९ पासून आजपर्यंत | | | | पाऊस (मिमी) गेल्या वर्षीचा | |
| २३.२ | | | | | | | ४२३३.४ | | | | २३५९.६ | |

**हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला**

**पुढील पाचही दिवस पाऊसाची उघडीप राहून आकाश अंशत: निरभ्र राहील तसेच कमाल आणि किमान तापमानात वाढ संभवते.**

**दिनांक १५ ते २१ नोव्हेंबर, २०१९ साठी कोंकण विभागासाठी पर्जन्यमानाचा विस्तारित श्रेणी अंदाज हा सामान्यपेक्षा कमी राहील. सामान्य फरक वनस्पती निर्देशांक (NDVI) नुसार पालघर जिल्ह्यामध्ये वनस्पती निर्देशांक चांगल्या स्वरूपाचा असून प्रमाणित पर्जन्यमान निर्देशांक (SPI) नुसार ओलावा स्थिती दर्शविण्यात आली आहे.**

| पिक | अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| **भात** | **पूर्व मशागत व पेरणी** | • रब्बी उन्हाळी भात लागवड करण्यासाठी पूर्व मशागतीची कामे करण्यास सुरवात करावी.<br>• भात रोपवाटीकेसाठी गादी वाफे तयार करावेत. प्रथम जमीन नांगरून ढेकळे फोडावीत आणि प्रती गुंठा क्षेत्रास १०० किलो शेणखत जमिनीत मिसळावे. जमिनीचा उतार लक्षात घेऊन, १ मी. x १० मी. अंतराचे गादीवाफे तयार करावे वाफ्यांना प्रती गुंठा क्षेत्रास १ किलो युरिया व ३ किलो सिंगल सुपर फॉस्फेट द्यावे.<br>• उन्हाळी भात लागवडीसाठी कर्जत-१८४, रत्ना, रत्नागिरी-१, रत्नागिरी-७४, रत्नागिरी-२४, रत्नागिरी-७११, कर्जत-१, कर्जत-३ या जातींचे बियाणे वापरावे.<br>• पेरणीपूर्वी बियाण्यास २.५ ग्रॅम प्रती किलो प्रमाणात थायरम बुरशीनाशक चोळावे.<br>• रोपवाटीकेतील तणांच्या बंदोबस्तासाठी पेरणीनंतर वाफे ओले होताच ऑक्सीडायरजील (६ ई. सी.) प्रती लिटर पाण्यात ३ मि. ली. याप्रमाणे प्रती गुंठा क्षेत्रास ५ लिटर या प्रमाणात एकसारखे फवारावे. |
| **वाल/ कडवा वाल** | **पेरणी** | • खरीप भात कापणी नंतर जमिनीची मशागत करून वाल पिकाची पेरणी करावयाची असल्यास जमिनी वाफसा स्थितीत आल्यावर नांगरट करून हेक्टरी ५ टन शेणखत किंवा कंपोस्टखत मिसळून जमीन समपातळीत आणून वाल बियाण्याची ३० ते ४५ किलो प्रति हेक्टरी प्रति हेक्टरी बियाणे टोकण पद्धतीने ३० x १५ से. मी. किंवा ३० x २० से. मी. किंवा ३० x ३० से. मी. अंतरावर करावी. पेरणीच्या वेळेस ५४० ग्रॅम युरिया आणि ३ कि.ग्रॅ सिंगल सुपर फॉस्फेट प्रती गुंठा ओळीमध्ये बियाण्याखाली साधारण ५ सें.मी. खोलीवर द्यावे. पेरणीनंतर हलके पाणी दयावे.<br>• पेरणीपूर्वी बियाण्यास थायरम बुरशीनाशकाची ३ ग्रॅम प्रती किलो बियाण्यास चोळावे व त्यानंतर एक किलो बियाण्यास २५ ग्रॅम या प्रमाणात रायझोबियम या जीवाणू संवर्धकाची प्रक्रिया पेरणीपूर्वी १ तास आधी व बुरशीनाशकानंतर करून बियाणे सावलीत सुकवावे. |
| **आंबा** | **पालवी** | • आंब्याच्या नवीन येणाऱ्या पालवीवर तुडतुडे, शेंडे पोखरणारी आणि मिजमाशीचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असल्याने पालवीचे किडींपासून संरक्षण करण्यासाठी लॅम्बडासायहॅलोथ्रीन ५ टक्के प्रवाही ६ मि.ली. किंवा क्विनोलफॉस २५ टक्के प्रवाही २५ मि.ली. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.<br>• निरभ्र आकाश व वाढत्या तापमानामुळे बाष्पीभवनात वाढ संभवत असल्याने नवीन लागवड केलेल्या आंबा कलमांना पहिली तीन वर्षे पाणी देण्याची व्यवस्था करावी तसेच जोडाच्या खाली बुंध्यावर येणारी फूट वेळोवेळी काढून टाकावी. पहिल्या वर्षी आठवडयातून एकदा तर दुसऱ्या वर्षी पंधरा दिवसातून एकदा व तिसऱ्या वर्षी महिन्यातून एकदा प्रत्येक कलमांना ३० लिटर पाणी दयावे. |
| **काजू** | **मोहोर** | • किडींपासून संरक्षण करण्यासाठी मोहोर फुटण्याच्या वेळी प्रोफेनोफॉस ५० टक्के प्रवाही १० मि.ली. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.<br>• निरभ्र आकाश व वाढत्या तापमानामुळे बाष्पीभवनात वाढ संभवत असल्याने नवीन लागवड केलेल्या काजू कलमांना पंधरा |

| | | |
|---|---|---|
| | | दिवसाच्या अंतराने १५ लिटर पाणी देण्याची व्यवस्था करावी तसेच जोडाच्या खाली बुंध्यावर येणारी फूट वेळोवेळी काढून टाकावी. |
| **नारळ** | **-** | • निरभ्र आकाश व वाढत्या तापमानामुळे बाष्पीभवनात वाढ संभवत असल्याने नवीन लागवड केलेल्या बागेस ६ ते ७ दिवसांच्या आणि पूर्ण वाढलेल्या माडास जमिनीच्या मगदुराप्रमाणे ५ ते १० दिवसांच्या अंतराने पाणी देण्याची व्यवस्था करावी. |
| **चिकू** | **फळधारणा** | • निरभ्र आकाश व वाढत्या तापमानामुळे बाष्पीभवनात वाढ संभवत असल्याने चिकू बागेस ७ ते ८ दिवसांच्या अंतराने पाणी देण्याची व्यवस्था करावी.<br>• चिकूवर बी पोखरणाऱ्या अळीचा प्रादुर्भाव दिसून येत असल्यास नियंत्रणासाठी चिकू बागेतील किडग्रस्त तसेच गळलेली सर्व फळे व पालापाचोळा गोळा करून नष्ट करावीत व बागेची स्वच्छता राखून बागेत पूरेसा सूर्यप्रकाश येईल असे पहावे. तसेच ५० टक्के प्रवाही प्रोफेनोफोस १५ मि. ली. किंवा १४.५ टक्के प्रवाही इंडोक्झाकार्ब ५ मि.ली किंवा २.८ टक्के प्रवाही डेल्टामेथ्रीन १० मि. ली. कीटकनाशकंची आलटून पालटून प्रति १० लिटर पाण्यातून एक महिन्याच्या अंतराने दोन फवारण्या कराव्यात. |
| **भेंडी** | **लागवड** | • भेंडी पिकाची लागवड जमिनीची नांगरट करून सरी पद्धतीने ४५ x १५ सें.मी. अंतरावर करावी. लागवडीच्या वेळेस १५० किलो शेणखत, ७०० ग्रॅम युरिया, ३ किलो सिंगल सुपर फोस्फेट आणि ४२० ग्रॅम म्युरेट ऑफ पोटाश प्रती गुंठा खताची मात्रा द्यावी. पेरणीनंतर हलके पाणी दयावे |
| **अस्टर फुलपिके** | **रोपवाटिका** | • अस्टर फुलपिकाच्या लागवडीसाठी रोपवाटिका तयार करावी. रोपे तयार करण्याकरिता २ मी. लांब X १ मी. रुंद X १० से.मी. उंचीचे गादीवाफे तयार करावेत. वाफे बारीक माती आणि शेणखतापासून बनवावेत. तयार वाफ्यावर १० ते १२ से.मी. अंतरावर १ सें.मी. खोलीवर ओळीत विरळ बी पेरून शेणखत व मातीच्या मिश्रणाने हलक्या हाताने झाकून घ्यावे व झारीने हलके पाणी द्यावे. |
| **झेंडू फुलपिके** | **रोपवाटिका** | • झेंडू फुलपिकाच्या लागवडीसाठी रोपवाटिका तयार करावी. रोपे तयार करण्याकरिता २ मी. लांब X २ मी. रुंद X १० से.मी. उंचीचे गादीवाफे तयार करावेत. वाफे बारीक माती आणि शेणखतापासून बनवावेत. तयार वाफ्यावर ४ ते ५ से.मी. अंतरावर १ सें.मी. खोलीवर ओळीत विरळ बी पेरून शेणखत व मातीच्या मिश्रणाने हलक्या हाताने झाकून घ्यावे व झारीने हलके पाणी द्यावे. |
| **सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीनुसारतयार करून प्रसारित करण्यात आली.**<br>**• अधिक माहितीसाठी नजीकच्या कृषी विद्यापीठाचे केंद्र किंवा महाराष्ट्र शासनाचे कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क करावा** | | |